ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53,
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १६ जानेवारी, १९५२ अंक ३

## विविध माहिती

**तिबेटशी व्यापार करण्यासाठी**— कलकत्ता येथें चिनी व तिबेटी व्यापाऱ्यांनीं एक कंपनी काढली आहे. तिचें नांव हिमालयन् सिंडिकेट असें असून भारत व तिबेट ह्यांच्या दरम्यान व्यापार करण्यासाठीं ती स्थापन करण्यांत आली आहे. तिबेट सरकारकडून ४०,००० रुपये किंमतीचीं कुदळी व खोऱ्यें पुरविण्याची मागणी कंपनीकडे आली आहे, असें समजतें.

**तांदूळ देतो, पण डॉलर पाहिजेत**— आग्नेय आशिआंतील ब्रिटिशांच्या ताब्यांतील देशांनीं सयामच्या तांदूळ निर्यातींपैकीं ४,७५,००० टन तांदुळाची मागणी केली आहे. सयाम तांदूळ देण्यास तयार आहे पण किंमत पौंडामध्यें घेण्यास त्याची तयारी नाहीं. तांदुळाची किंमत डॉलर्समध्यें मिळण्याची मागणी केल्यामुळें व्यापारी वाटाघाटींत विघ्न निर्माण झालें आहे.

**ब्रिटनसाठीं भारतीय कोळसा**— ९,००० टन भारतीय कोळसा स्कॉटलंडला पाठविण्यांत आला आहे. त्याची वांटणी कारखान्यांसाठीं व घरांत वापरण्यासाठीं करण्यांत येणार आहे. कोळशाची प्रत ब्रिटिश कोळशाच्या चार नंबरच्या प्रतीबरोबर आहे.

**प्रिन्सेस एलिझाबेथला नजराणा**— ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जातांना प्रिन्सेस एलिझाबेथ कोलंबोला भेट देणार आहेत. त्यावेळीं त्यांना सिलोनी मोत्यांची भेट देण्यांत येणार आहे. त्याकरितां सीलोनमधील पाणबुड्यांनीं मौल्यवान मोती काढण्यासाठीं आपल्या कामाला प्रारंभ केला आहे.

**मलायांतील बंडांसंबंधीं बोलपट**— मलायामधील बंडासंबंधीं बोलपट काढण्याचें ब्रिटनच्या रँक ऑर्गनायझेशननें ठरविलें आहे. ह्या बोलपटांत राम गोपाळ ह्या हिंदी नृत्यविशारदास रबराच्या मळ्यांतील मुकादमाचें काम मिळालें आहे. क्लॉडेट कॉलबर्ट ही एका मळेवाल्याच्या पत्नीचें काम करणार आहे.

**सिंद्री कारखाना**—सिंद्री फर्टिलायझर्स अँड केमिकल्स कं. लि. च्या डायरेक्टर बोर्डाची पहिली सभा ३१ डिसेंबर रोजीं झाली. फर्टिलायझर कारखान्याचें येणें-देणें कंपनीकडे वर्ग करण्याची सरकारची सूचना बोर्डानें मान्य केली. इंपीरिअल बँकेच्या धनबाद शाखेंत कंपनीचें बँक खातें उघडण्याचेंहि ठरलें.

**म्हैसूरला जॉइंट रजिस्ट्रार**—म्हैसूर सरकारच्या सहकारी खात्याचें काम गेल्या दोन वर्षांत फारच वाढलें आहे. म्हणून, जॉइंट रजिस्ट्रारची नेमणूक करण्यास म्हैसूर सरकारनें मंजुरी दिली आहे.

**पाकिस्तानाकडे किती कापड जाणार ?**—भारत-पाकिस्तान व्यापारी कराराप्रमाणें जानेवारी-जून, १९५२ ह्या मुदतींत खालीलप्रमाणें कापडाची निर्गत पाकिस्तानकडे करण्यास परवाने दिले जातील:—

जाडेभरडें—३ कोटी, १४ लक्ष वार.
मध्यम—१ कोटी, ४६ लक्ष वार.
तलम—१ कोटी १५ लक्ष वार.

**धरणावरील खर्चाच्या रकमेंत वाढ**—भारत सरकारला चालू वर्षीं मूळ अंदाजापेक्षा ज्यास्त करवसुलीचें उत्पन्न झालें. त्यामुळें धरण योजनांवरील खर्च चालू वर्षी ५४·०२ कोटी रुपयांपर्यंत होण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे. ह्या रकमेपैकीं ४० कोटी रुपये चार प्रमुख योजनांसाठीं आहे.

**पाकिस्तानचा ऑस्ट्रेलिआशीं व्यापारी तह**—पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिआ ह्यांनीं परस्परांत एक वर्ष मुदतीचा व्यापारी करार केला आहे. ऑस्ट्रेलिआ पाकिस्तानकडून ताग, कापूस, चहा, खेळण्याचें सामान, इत्यादि वस्तू घेणार असून लोंकर व लोंकरीचें सूत, सायकली, विजेचीं उपकरणें, यात्र्या, पंप व इतर यंत्रसाहित्य पुरविणार आहे.

**इजिप्त-रशिआ व्यापारी करार**—इजिप्त व रशिआ ह्यांच्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर व्यापारी करार होणार असल्याचें समजतें. रशिआकडून तेल, यंत्रें, कागद, रसायनें, गहू व विजेचीं उपकरणें घेऊन इजिप्त रशिआला कापूस पुरविणार आहे. मोठमोठ्या उपयुक्त कामासाठीं रशिआची मदत घेण्यांत यावी असेंहि इजिप्तच्या फडणिशी खात्याचें मत आहे.

**अमेरिकेमधील गाईंना रबराची शय्या**— अमेरिकेमधील डेअरींतून गाईंना झोपण्यासाठीं म्हणून रबर व स्पंजाच्या तरटांचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे. इंडिआनापोलिस, स्टेटमधील एक कंपनी अशा प्रकारचीं तरटें तयार करते. अलीकडे ह्या तरटांचा खप वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे.

**आपखुषीनें बांध घालणार**—बदाऊन (बिहार) जिल्ह्यांतील २८ गांवांच्या गांवकऱ्यांनीं १ मैल लांबीचा एक बांध स्वतः श्रम घेऊन घालण्याचें ठरविलें आहे. हा बांध तयार झाल्यावर पावसाळ्यांतील पुराचा धोका असलेलीं बरीच खेडीं निर्भय होतील. जिल्हाधिपतींच्या हस्तें ह्या कामाला २२ डिसेंबर, १९५१ रोजीं सुरवात झाली. जिल्हा नियोजन कमिटीतर्फे ९००रुपयांची देणगी ह्या कामासाठीं देण्यांत आली आहे.

**वस्तुसंग्रहालयासाठी इजिप्तमधील ममी—** लखनौ येथील पदार्थ संग्रहालयासाठी ४२ इजिप्शिअन ममी मिळणार आहेत, असें समजतें. त्याशिवाय भारतीय व इजिप्शिअन कलाकुसरींच्या वस्तूंची देवाण-घेवाणहि उभय देशांमध्यें होणार आहे. मृत शरीर टिकवून ठेवण्यासाठी प्राचीन इजिप्शिअन लोक काय मसाला वापरीत होते त्याबद्दल अजूनहि माहिती उपलब्ध नाहीं, असें म्हणतात.

**भारताचें मिठाचें उत्पादन—** भारताचें मिठाचें उत्पादन आतां इतकें वाढलें आहे कीं मिठाची आयात तर करावी लागणार नाहींच; उलट मीठ निर्यातहि करतां येईल. १९५० सालीं भारतांत ७१३ लाख मण मीठ तयार झालें. १९५१ सालीं ७३२ लाख मण मीठ तयार होईल असा अंदाज आहे. १९५२ सालीं सुमारें ७६० लाख मण मीठ निर्माण होईल. सध्या भारताकडून पूर्व-बंगालला ४·८ लाख मण मीठ निर्यात करण्यांत येत आहे. १९५२ च्या पहिल्या सहा महिन्यांत २५ लाख मण मीठ जपानला निर्यात करण्यांत येईल.

**दाढीवर कर—** रशिआचा झार, पीटर दि ग्रेट, ह्यानें १७०५ सालीं दाढी राखणाऱ्या नागरिकांवर १०० रुबल्स कर बसविला होता. १७२२ सालीं त्यानें अशी आज्ञा काढली कीं जे दाढी राखत असतील त्यांनीं विशेष प्रकारचा पोषाख वापरावा आणि ५० रुबल वार्षिक कर भरावा. ज्यांना कर भरतां येत नसेल त्यांना सश्रम कारावासाची शिक्षा देण्यांत येई.

**तिबेटमध्यें पहिला लोकरीचा कारखाना—** चिनी कम्युनिस्टांनीं ल्हासामध्यें लोकरीच्या कारखान्याचीं यंत्रें आणल्याची बातमी आहे. तिबेटमध्यें अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्यांत कामाला लवकरच प्रारंभ होईल. हिंदी सरहद्दीवरील कालिंगपॉंग ह्या गावाच्या द्वारां तिबेट दरवर्षी सुमारें १ लाख मण लोकर परदेशीं निर्यात करीत असे.

**व्यापारी देवघेवींत अडथळा—** इराणनें कबूल केल्याप्रमाणें १,२०० टन कापूस पुरविल्याशिवाय कराराप्रमाणें द्यावयाची ६,००० टन साखर आपण देणार नाहीं, असें रशिआनें जाहीर केल्याचें समजतें.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

॥ सत्यमेव जयते ॥

रविवार ता. ३०-१२-१९५१ च्या वार्षिक सभेंत
— सिंडिकेटच्या भागीदारांनीं —
नफा-तोटा-पत्रक ताळेबंद व डायरेक्टरांचा अहवाल
— मंजूर केला —

ऑर्डिनरी शेअरच्या भरलेल्या रकमेवर
**शेकडा १० टक्के नफा देण्याचें मंजूर केलें**

सिंडिकेटच्या प्रारंभींच्या भागीदारांना
**हजार रुपयांच्या शेअरवर हजार रुपये नफा मिळाला आहे**

शेअर-विक्री सुरू आहे
**ठेवींची योजना १ एप्रिल १९५२ पर्यंत चालू राहील**

***ठेवींची मुदत १ वर्ष—व्याज ६ टक्के***

शेअर व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ७ जानेवारी १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्‌एल्. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.

# अर्थ

बुधवार, ता. १६ जानेवारी, १९५२





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## १९५० मध्यें आयुर्विमा कामांत घट

भारत सरकारच्या विमा अधिकाऱ्यानें तयार केलेल्या ताज्या हिंदी विमा वार्षिकांत भारतांतील विमा व्यवसायाच्या १९५० मधील कामाचा आढावा घेतला आहे, त्यावरून ह्या व्यवसायाचें १९४९ चे मानानें आखडतें पाऊल पडलें आहे, असें दिसून येतें. १९५० सालीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांनीं ६·४६ कोटी हप्त्यांचे ११८·३८ कोटी रुपयांचे ४,७९,००० विमे स्वीकारले. म्हणजे, १९४९ चे मानानें विम्यांची संख्या ४७,००० नें घटली असून विम्यांची रक्कम ४·७५ कोटी रुपयांनीं कमी झाली आहे आणि सहाजिकच त्यांचे हप्तेहि ·२७ कोटी रुपयांनीं लहान आहेत. हिंदी विमा कंपन्यांचा हा अनुभव असतांना, विदेशी कंपन्यांना मात्र भारतांत १९४९ पेक्षा थोडें जास्तच काम मिळवितां आलें, हें उल्लेखनीय आहे. त्यांनीं १९५० मध्यें १३·७० कोटी रुपयांचे विमे येथें स्वीकारले. त्यांच्या पॉलिसींची संख्या १९,००० होती व त्यांचे हप्ते ·८२ कोटी रुपयांचे होते.

हिंदी विमा कंपन्यांचें चालू असलेलें कामहि १९४९ चे मानानें १९५० मध्यें कमी झालें आहे. १९५० अखेर एकूण ३०,४९,००० विमे चालू होते; त्यांची रक्कम ६३५·८१ कोटी रुपये होती व त्यांचे वार्षिक हप्ते ३१·५९ कोटी रुपयांचे होते. म्हणजे, १९४९ चे मानानें चालू विम्यांची संख्या २५,००० नें कमी झाली आणि त्यांची रक्कम १·१४ कोटी रुपयांनीं उतरली. हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न मात्र १३ लक्ष रुपयांनीं ज्यास्त होतें. विदेशी कंपन्यांचें भारतांतील चालू काम मात्र २,००० विम्यांनीं व ६·३० कोटी रुपयांनीं वाढून तें २,३१,००० पॉलिसी, १०८·८४ कोटी रुपयांची रक्कम व ६·११ कोटी रुपयांचे हप्ते, असें होतें. विदेशी कंपन्यांनीं नवें काम ज्यास्त मिळविलें व त्यांच्या चालू कामांत वाढ झाली, ह्या दोन्ही गोष्टी हिंदी कंपन्यांच्या वाट्यास आलेल्या अनुभवाचे अगदीं विरुद्ध आहेत आणि त्यापासून हिंदी कंपन्यांनीं बोध घेणें इष्ट आहे. विमा कंपन्यांचा व्यवस्था-खर्च पाहिला, तर त्याहि बाबतींत विदेशी कंपन्यांचा सरसपणा आढळतो. हिंदी कंपन्यांचे बाबतींत तो खर्च २८·९% आहे, तर विदेशी कंपन्यांचे बाबतींत तो २१·८% आहे.

नव्या विमा कायद्यामुळें हिंदी विमा व्यवसायाच्या प्रगतीस कितपत वाव मिळतो व त्यांच्या अडचणी किती वाढतात, हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. तथापि, विम्याचें काम पूर्वीप्रमाणें वाढत जाण्याची प्रवृत्ति मंदावली आहे, हें निश्चित. सरकारी रोख्यांचे बाजारभाव १९५१ अखेर उतरले, त्याचा परिणाम १९५१ अखेरच्या हिशेब पत्रकांत दिसून येईल. मोठ्या हिंदी कंपन्यांच्या कामांत विशेष खंड पडत नसून लहान व मध्यम आकाराच्या कंपन्यांसच अधिक नेटानें प्रयत्न करावा लागत आहे. म्हणजे विदेशी कंपन्यांपेक्षा देशी कंपन्यांस व त्यांतहि बहुसंख्य लहान-मध्यम आकाराच्या कंपन्यांस मंदी ज्यास्त जाणवेल, हें उघड आहे. अर्थात् त्यांतहि कांहीं कंपन्या उत्कृष्ट दर्जाच्या आहेत.

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

### रोख्यावरील घसाऱ्याचा मागमूसहि नाहीं

गेल्या वर्षाचा शिलकी नफा धरून, वरील बँकेस १९५० सालीं ४०,२०,९५२ रु. नफा झाला. गेल्या वर्षीं पेक्षां हा नफा सुमारें १ लक्ष रुपयांनीं अधिक आहे. त्यापैकीं १५ लक्ष रु. इनव्हेस्टमेंट खातीं वर्ग करून, ८ लक्ष रु. ची करांची तरतूद करून आणि ७½ लक्ष रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ९,७०,९५२ रु. उरतात. प्रत्येक भागास करमाफ २ रु. डिव्हिडंड देण्यासाठी ८ लक्ष रुपयांचा विनियोग करावा आणि १,७०,९५२ रु. १९५२ च्या हिशेबांत ओढण्यांत यावेत, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. ३१ डिसेंबर रोजीं रोख्यांचे जे बाजारभाव होते, त्याच किंवा त्यापेक्षा कमी भावानें त्यांची किंमत धरण्यांत आली आहे, आणि तसें करूनहि वरीलप्रमाणें उत्कृष्ट नफा झालेला दिसत आहे. सरकारी रोख्यांच्या बाजारभावांतील घटीमुळें बहुतेक सर्व बँकांच्या ताळेबंदावर अनिष्ट परिणाम होणार आहे. बँकांना सहन करावा लागणारा हा घसारा एकदम लिहून टाकण्याजोगी परिस्थिति अगदीं अपवादात्मकच आढळेल. त्यामुळें, ताळेबंदांत रोख्यांची जी किंमत दाखवावयाची, तिचेबाबत बँकांना सवलत देणें रिझर्व्ह बँकेला भाग पडलें. तथापि ह्या सवलतीचा फायदा घेण्याची जरूरी युनायटेड कमर्शिअल बँकेस पडली नाहीं आणि स्वतःच्या मजबुतींतूनच घसारा नाहींसा करून आणि योग्य त्या तरतुदी नेहमीप्रमाणें करूनहि प्रत्येक भागास २ रु. करमाफ डिव्हिडंड कायम राखूं शकली आहे. बँकेनें रोख्यांचे भाव उतरण्याची आपत्ति योग्य वेळीं अंदाजून त्याप्रमाणें आपले जवळील रोख्यांचें इष्ट त्या प्रकारच्या रोख्यांत रूपांतर केलें असलें पाहिजे. नाहींतर मोठ्या बँकांपैकीं तुलनात्मक दृष्टीनें ह्या नव्या बँकेस अशी परिस्थिति निर्माण करतां आलीच नसती. ह्यावरून बँकेच्या चालकांच्या कर्तबगारीची व यशस्वी कारभाराची कल्पना येईल.

---

### इंटरनॅशनल बँकेचा शिक्षण वर्ग

इंटरनॅशनल बँकेनें आठ देशांतील आठ तरुणांची बँकेतर्फे चालविण्यांत येत असलेल्या शिक्षणवर्गासाठीं निवड केली, त्यांत भारतांतील श्री. कृष्णन् कपूर हे आहेत. बँकेची कामकाजाची उमेदवारांना माहिती दिली, म्हणजे ते तिचा उपयोग आपआपल्या देशांत जाऊन करतील असा ह्या शिक्षणवर्गाचा उद्देश आहे.

---

### प्रिन्सेस एलिझाबेथच्या भेटीच्या वेळीं चैनीस प्रोत्साहन

प्रिन्सेस एलिझाबेथ व ड्यूक ऑफ एडिंबरा हे फेब्रुवारींत कोलंबोला जाणार आहेत. त्या प्रसंगीं सर्व सिलोनी सरकारी नोकरांना चैन करतां यावी, म्हणून सिलोन सरकार त्यांना एक महिन्याचा पगार आगाऊ देणार आहे. त्याची रक्कम पुढें लहान लहान हप्त्यांनीं वसूल केली जाईल.

## १९५२ मधील आर्थिक परिस्थिति

### तज्ज्ञांचें व हितसंबंधीयांचें मतप्रदर्शन

परदेशांतील चलनविस्ताराच्या परिस्थितीवरून व निरनिराळ्या सरकारांच्या धोरणावरून असें दिसतें कीं सरकारची मालासाठीं व पैशासाठी मागणी वाढेल व त्यामुळें परदेशांशीं व्यापारी संबंधांत असलेलीं बंधनें ढिलीं केलीं जाण्याची शक्यता फारशी दिसत नाहीं. यामुळें जागतिक व्यापाराला सुलें वळण लागण्याची शक्यता नाहीं. व्यापारी जगांत अशी परिस्थिति निर्माण होण्याची शक्यता आहे कीं अटलांटिक कराराच्या क्षेत्रांत येणाऱ्या देशांचें लक्ष युद्धतयारीकडे लागल्यामुळें चलनविस्ताराचे दुष्परिणाम टाळणें त्यांना अशक्य होईल, तर जगांतील इतर बहुतेक राष्ट्रांना स्वतःची परिस्थिति सुधारण्यासाठी आयातीच्या बाबतींत नियंत्रित धोरण स्वीकारावें लागेल.

मुंबईच्या वेस्टर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सचे मावळते अध्यक्ष, श्री. सोमानी हे वार्षिक बैठकीच्या वेळीं भाषण करतांना म्हणाले कीं जपान युद्धपूर्वीची बाजारपेठ जिंकण्याचा प्रयत्न करीत आहे व त्याचे परिणाम हिंदच्या अर्थव्यवस्थेला सहन करावे लागतील. जपान सौम्य चलनाचा देश असल्यामुळें सौम्य चलनाच्या देशांशीं व्यापारी संबंध वाढविणें जपानला शक्य होईल. गेल्या वर्षांत हिंदमध्यें त्यांच्या मतें औद्योगिक उत्पादनाची सामान्यतः प्रगति झाली असून सरकारी नियंत्रणांचें स्वरूप जास्त वास्तववादी राहिल्यास अंतर्गत उत्पादनांत आणखी प्रगति होऊं शकेल. सरकारनें नेमिलेल्या आर्थिक कमिशनचें स्वागत करून ते म्हणाले कीं मध्य सरकार व राज्य सरकारें यांमधील उत्पन्नाचें प्रमाण ठरवून देण्याव्यतिरिक्त निरनिराळे कर कोणत्या तत्त्वांवर बसविले गेले आहेत व ते कितपत योग्य किंवा अयोग्य आहेत याचाहि विचार कमिशननें करावा. सदरहू चेंबरचे नवीन अध्यक्ष श्री. बेगराज गुप्ता म्हणाले कीं परराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत बहुतेक सर्व सवलती वाहातुक धंद्यांतील जुन्या स्थिरस्थावर झालेल्या मंडळ्यांना मिळत असल्यामुळें या धंद्यांत प्रवेश करणाऱ्या नवीन लोकांची कुचंबणा होत आहे, व त्यामुळें श्रीमंत अधिक श्रीमंत बनत असून गरीब अधिक गरीब बनत आहेत.

१९५२ च्या पहिल्या सहामाहींतील आयातीच्या बाबतींत सरकारी धोरण नुकतेंच जाहीर झालें असून त्यामुळें सामान्य जनतेच्या कक्षेंत येणाऱ्या कांहीं उपभोग्य वस्तूंचा पुरवठा वाढण्यास मदत होणार आहे. बांधकामाला आवश्यक अशीं कौलें, लोकरीचे व इतर कपडे इ. तयार करावयास लागणारें साहित्य, औषधें तयार करावयास लागणारीं द्रव्यें, इ. चा पुरवठा वाढणार आहे. कार्बन पेपर, शाई, चिकटविण्याचे पदार्थ, इ. चा पुरवठाहि वाढणार आहे. मात्र याबाबतींत अशा साहित्याच्या एकंदर परवान्यांच्या एक-दशांश किंमतीच्याच वस्तूंना परवानगी देण्यांत आली आहे. अंतर्गत उत्पादनाचा दर्जा सुधारावा, व त्याचबरोबर गिऱ्हाइकाला शक्य तितक्या जास्त परदेशांतील वस्तूहि उपलब्ध व्हाव्या, हा आयातीबद्दलच्या नवीन धोरणाचा उद्देश दिसतो.

तलम कापडाच्या अंतर्गत किंमतींत इजिप्तच्या कापसाची किंमत दौढल्यामुळें २ टक्के वाढ सरकारनें जाहीर केली आहे व त्याचबरोबर १९५२ च्या पहिल्या सहामाहींत परदेशच्या निर्गतीसाठी २५ कोटी वार कापडाची परवानगी दिली आहे. याच वेळीं गेल्या वर्षात परवाना दिलेलें परंतु निर्गत करावयाचें राहून गेलेलें १८ कोटी वार आणखी कापड हिशेबांत धरावयाचें आहे. म्हणजे १९५२ च्या पहिल्या सहामाहींत कापडाची निर्गत ४३ कोटींची राहील.

ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या बैठकींत भाषण करतांना श्री. पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांनीं सरकारच्या कापूस नियंत्रणाच्या धोरणावर टीका केली. हिंदी कपाशीपेक्षां आयात होणाऱ्या कपाशीची किंमत जास्त असल्यामुळें महागाई व चलनविस्तार यांना मदतच होते. यामुळें पुरवठा व दर्जा या दोनहि बाबतींत कापसाच्या पिकावर अनिष्ट परिणाम होत आहे.

पाटणा येथें भरलेल्या आर्थिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. एच. एल. डे यांनीं असें सुचविलें कीं भावी काळांतील परिस्थिति आटोक्यांत आणण्यासाठी सरकारनें वस्तूंच्या किंमतीचा निर्देशांक निदान १००पर्यंत तरी खालीं आणला पाहिजे. सध्यां किंमती ४४० पर्यंत आहेत त्या उतरल्याशिवाय आर्थिक परिस्थिति आटोक्यांत येणार नाहीं. किंमतींची धारणा हा आजच्या आर्थिक जीवनाचा मूलभूत पाया आहे, असें ते म्हणाले.

---

**इंग्लंडमधील वाढती महागाई**—१ जानेवारीपासून कित्येक जिनसांचे भाव इंग्लंडमध्यें वाढविण्यांत आले आहेत. कोळसा ५% महागला आहे. आगगाडींचे माल वहातुकीचे दर १०% वाढले आहेत. बेकनची किंमत २०% वाढली आहे. चीज ७०% महागलें आहे. अल्युमिनिअमच्या किंमतमिधील वाढ २०% आहे. मॉरिस कारखान्यांत, तयार होणाऱ्या मोटारगाड्यांची किंमत १२% ज्यास्त झाली आहे. १९५२ च्या अंदाजपत्रकांत आणखी किंमतवाढ केली जाईल, असा अंदाज आहे.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

भांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें ... ... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... ... | रु. ५,१७,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... ... | रु. ३ कोटींचे वर |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

★ बँकेच्या बांधत असलेल्या टोलेजंग इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय होणार.

★ एक्झिक्युटर व ट्रस्टींचीं कामें महाराष्ट्र एक्झिक्युटर आणि ट्रस्टी कंपनी करते.

हेड ऑफिस : लक्ष्मी रोड, पुणें २

चिं. वि. जोग
मॅनेजर.

( पॅरमाउंट लि. )

# मिरे

## ( महत्त्वाचें व्यापारी पीक )

लेखकः—श्री. वा. कृ. कोमेकर, एल. एजी.

मिरे किंवा मिरी हें व्यापारी दृष्ट्या एक अत्यंत महत्त्वाचें पीक आहे. या पदार्थाचें व्यापारी महत्त्व सध्यां किती वाढलेलें आहे हें खालील हकीगतविरून दिसून येईल. दुसऱ्या महायुद्धापूर्वी मिरीच्या एका खंडीस ( ६७५ पौंड ) रु. ११२ किंमत असे, ती आतां एका खंडीस रु. ४,००० ( चार हजार ) झालेली आहे. ही किंमत आणखी जास्त वाढण्याचा संभव आहे असेंहि बोलण्यांत येतें. किंमत वाढण्याचें कारण असें कीं लढाईपूर्वी फार मोठ्या प्रमाणावर इंडोनेशियामध्यें (जावा, सुमात्रा, बोर्निओ, सेलीबीज, वगैरे बेटें ) मिरीचें पीक होत असे व तेथून मिरीची निर्यात मोठ्या प्रमाणावर युरोपांत होत असे. सध्यां तेथील मिरीची लागवड बरीच कमी झाल्यामुळें तिकडून मिरे परदेशीं जाण्याचें प्रमाण बरेंच घटलें आहे. लढाईपूर्वी हिंदुस्थानांतून मिरीची निर्गत जवळजवळ एक हजार टनापर्यंत होती व यापासून उत्पन्न सुमारें तीन लक्ष रुपये होतें. परंतु सन १९५०–५१ सालामध्यें मिरीची निर्यात १५,००० ( पंधरा हजार ) टनापर्यंत वाढली व किंमत रु. २० कोटीपर्यंत गेली. सध्यां हिंदुस्थान हा अमेरिकेस मिरीचा पुरवठा करणारा प्रमुख देश झालेला आहे. त्यामुळें अमेरिकेकडून डॉलर मिळविण्याचें मिरी हें एक मोठें साधन झालेलें आहे. सन १९५०–५१ मध्यें अमेरिकेच्या एकंदर मिरीच्या पुरवठ्यापैकीं सुमारें ८० टक्के मिरीचा पुरवठा हिंदुस्थानांतून झाला. परंतु लढाईपूर्वी हें प्रमाण केवळ २ टक्केच होतें. यावरून सध्यां मिरीची लागवड वाढविण्यास फारच चांगली संधि आहे असें दिसून येईल. हिंदुस्थानमध्यें मिरीचें पीक लागवडीपासून तीन वर्षांत तयार होतें. परंतु इंडोनेशियामध्यें हें पीक तयार होण्यास सात वर्षें लागतात. ही एक हिंदुस्थानाच्या दृष्टीनें फायद्याची गोष्ट आहे. इंडोनेशियामध्यें हल्लीं सुमारें ८,००० टन मिरे तयार होतात. लढाईपूर्वी हें उत्पादन ५८,००० टन इतकें होतें. तेव्हां आणखी कांहीं वर्षें तरी हिंदुस्थानांतून मिरीस मागणी बरीच होण्याचा संभव आहे. करितां, हिंदुस्थानांतील मिरी पिकणाऱ्या प्रदेशांतील मळेवाल्यांनीं या पिकाच्या लागवडीकडे जास्त लक्ष देऊन उत्पन्न वाढविण्याची दक्षता घेणें फायद्याचें होईल यांत शंका नाहीं. वरीलप्रमाणें हिंदुस्थानांतून मिरे मोठ्या प्रमाणावर निर्यात होत असल्यामुळें व्यापारी व माल पिकविणारे यांना पुष्कळ फायदा होत असला तरी हिंदुस्थानांतील जनतेस मिरे फारच महाग दरानें मिळूं लागले आहेत. सध्यां काळ्या मिरीचा भाव एक शेरास रुपये १५ प्रमाणें असून पांढऱ्या मिरीचा भाव एक शेरास रु. ३० प्रमाणें आहे. लढाईपूर्वी हें भाव अनुक्रमें एक शेरास रु. २ व रु. ५ असे होते.

हिंदुस्थानमध्यें मिरीचें उत्पादन सुमारें ३२,००० टन होतें. परंतु पूर्वी या उत्पादनापैकीं ९०० टनच फक्त परदेशीं जात असे. त्याऐवजीं आतां १५,००० टन, म्हणजे सुमारें निम्मे परदेशीं निर्यात होतें. यामुळें येथें मिरीचा पुरवठा कमी पडल्यानें वर दर्शविल्याप्रमाणें मिरीचे भाव फारच वाढले गेले आहेत. यावरूनहि, हिंदुस्थानांत मिरीचें उत्पादन वाढविण्याची जरूरी आहे असें दिसून येईल. उत्पन्न वाढल्यानें म्हणजे अमेरिका, ब्रिटन, वगैरे परदेशी पेठा काबीज करतां येऊनहि देशांत मिरीचा भरपूर पुरवठा होऊं शकेल. अर्थात् इंडोनेशियाचें उत्पन्न पूर्वीइतकें होईतोंपर्यंतच केवळ हिंदुस्थानला या संधीचा फायदा घेतां येईल हें उघड आहे. मिरीच्या निर्गतीमुळें सरकारासहि कांहीं प्राप्ति होते. तेव्हां सरकारकडूनहि उत्पन्न वाढीच्या बाबतींत प्रयत्न होणें जरूर आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. ( स्थापना १९१८ )
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

### लागवड व पीक

वरीलप्रमाणें मिरी या एका मसाल्याच्या पदार्थाचें व्यापारी-दृष्ट्या महत्त्व यासंबंधानें उल्लेख केल्यानंतर पिकाच्या दृष्टीनें लागवड व इतर सर्वसाधारण माहिती खालीं थोडक्यांत दिली आहे.

**मूलस्थानः**— मलबार व त्रावणकोर येथील जंगलांमध्यें मिरीचे वेल पहिल्यानें सांपडले व तेथून यांची लागवड या भागांत मोठ्या प्रमाणावर होऊं लागली. अर्थात् हिंदुस्थान हें मिरीचें मूलस्थान असून येथूनच मिरीची लागवड मोठ्या प्रमाणावर जावा, सुमात्रा, मलाया, सयाम, फिलीफाइन्स, वेस्ट इंडीज, वगैरे ठिकाणीं होऊं लागली. मुंबई इलाख्यांत मिरीची लागवड कारवार जिल्ह्यांतील शिरशी, सिद्दापूर, सुपे, वगैरे भागांत होते.

**हवामान, लागवड वगैरेः**— मिरीस उष्ण व सर्द हवा लागते. पावसाचें मान निदान १०० इंच तरी असावें लागतें. मिरीचे वेल असतात. मिरीची लागवड सुपारीच्या झाडाच्या आळ्यांत वेलाचे तुकडे लावून करतात. प्रत्येक आळ्यामध्यें वेलाचे तीन तुकडे सुपारीच्या बुंधाच्या बाजूस लावतात व यापासून फूट होऊन प्रत्येक आळ्यांत तीन वेल तयार होतात. नंतर ते सुपारीच्या झाडास ठिकठिकाणीं बांधल्यानें झाडाच्या आधारानें वर चढत जातात. हे वेल सुमारें २० ते २५ फूटपर्यंत वाढतात. सुपारीच्या झाडास दिलेलें खतपाणी वगैरे या वेलांसही मिळतें व यांची वाढ होत जाते. वेल लावल्यापासून तीन वर्षांनीं यास फळें येऊं लागतात. प्रत्येक वर्षी फुलाचा बहार जुलै-ऑगस्ट मध्यें येतो व फळें काढण्यास मार्चमध्यें तयार होतात. याप्रमाणें तीन वर्षांनंतर प्रत्येक वर्षी बहार येऊन फळाची तोड होत जाते. वेल लावल्यापासून सुमारें २५ ते ३० वर्षेंपर्यंत वेल पीक देतात.

फळांचे घोस काढल्यानंतर ते चांगले वाळवितात व नंतर चोळतात. त्यामुळें वरचें टरफल निघून जाऊन काळी मिरी तयार होते. या मिरीपासूनच पुढें पांढरी मिरी परदेशांत पाठविण्याकरितां तयार करतात. याकरितां काळे मिरे वाळल्यानंतर ते, सुमारें ७ ते ८ दिवस पाण्यांत भिजत घालतात व नंतर ते चोळतात. त्यामुळें वरचा काळा भाग निघून जातो. नंतर ही मिरी वाळवितात व पांढरी मिरी तयार होते. काळ्या मिरीपेक्षां पांढरी मिरी तिखटपणांत थोडी कमी असते. पाश्चात्य देशांत मिरीचा उपयोग खाद्य पदार्थांत तिखटपणा व स्वाद आणण्याकरितां करतात हें सर्वांस विदित आहेच. औषधाकडे मिरीचा उपयोग होतो हेंहि मशहूर आहे.

**पूर्व इतिहासः**—मिरीची लागवड हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून होत असल्यामुळें हिंदुस्थान व युरोप या देशामध्यें

मिरे हा एक व्यापाराचा महत्त्वाचा जिन्नस या नात्यानें याचा व्यापार सारखा चालत असे. मिरींचें महत्त्व युरोपियन लोकांस किती वाटत होतें हें खालील हकीगतीवरून दिसून येईल.*

### युरोपियनांस मिरीचें महत्त्व

इसवी सन ४०८ मध्यें अॅलेरिक या ट्यूटॉनिक वंशीयानें रोमवर स्वारी करून त्यांत तो विजयी झाल्यानंतर त्यानें रोमकडे ३,००० (तीन हजार) पौंड मिरीच्या खंडणीची मागणी केली. यावरून त्या काळीं मिरी हा अतिशय महत्त्वाचा व किंमतीचा पदार्थ मानला जात होता हें स्पष्ट होतें. ही सर्व मिरी हिंदुस्थानांतून जात असे. पुढें पोर्तुगीज व डच या लोकांचें या व्यापाराकडे लक्ष वळल्यानंतर मिरीच्या व्यापाराच्या लोभानें हिंदुस्थानशीं समुद्रमार्गें अधिक जवळचा दळणवळणाचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न त्यांनीं चालू केला व सन १४९८ मध्यें केप ऑफ गुडहोपमार्गें हिंदुस्थानशीं दळणवळण चालू झालें. यानंतर युरोपमध्यें मिरीचा व्यापार मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. याप्रमाणें मिरीची आयात वाढूं लागल्यामुळें पूर्वीपेक्षां मिरीची किंमत कमी झाली.

वरील हकीगतीवरून मिरे या मसाल्याच्या पदार्थाचें महत्त्व पाश्चात्य देशांत किती मोठें आहे, याची कल्पना येईल.

*Encyclopædia Britanica, 14th Edition, Vol. 17.

---

### खेळण्याच्या सामानाच्या धंद्याचें स्थलांतर

भारताची फाळणी झाल्यानंतर पंजाबमधील खेळण्याचें सामान तयार करण्याच्या धंद्याची बरीच वाताहत झाली. सियालकोटहून बरेचसे कारखानदार उत्तर प्रदेशांत गेले. आतां उत्तर-प्रदेश सरकार त्यांना मदत करून धंद्याची पुन्हां जुळणी करीत आहे. ह्या कामांत बरीच प्रगतीहि झाली आहे. ह्या धंद्याचीं ५७ केंद्रें संयुक्त प्रांतांत स्थापन करण्यांत आलीं आहेत. त्या सर्वांत मिळून ६,००० कामगार पोट भरीत आहेत. वार्षिक उत्पादनाची किंमत सुमारें ४० लाख रुपये होते व त्यांतील चवथा हिस्सा माल परदेशीं निर्यात केला जातो. बहुतेक कारखानदारांनीं मीरत आणि आग्रा भागांत आपला उद्योग पुन्हां चालू केला आहे. ह्या धंद्याला योग्य असें हवामान विशेषतः मीरत भागांत आहे. म्हणून येथील निर्वासित कारखानदारांना सरकारनें शक्य त्या सर्व सवलती दिल्या आणि मदत केली. संयुक्त-प्रांताचें सरकार आणि निर्वासित पुनर्घटना खातें ह्यांनीं मिळून कारखानदारांना सुमारे २ लाख रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. टेनिसच्या व बॅडमिंटनच्या रॅकेटस, हॉकीच्या काठ्या, क्रिकेटच्या बॅटी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेटचे चेंडू, पोहण्याचे पोषाख, इत्यादि अनेक प्रकारचा माल कारखान्यांतून तयार होतो. माल तयार करण्यासाठीं लोखंड, पोलाद, कातडें, लाकूड, कापड, सूत, इत्यादि कच्चा माल लागतो. त्याचा तुटवडा असून सुद्धां कारखानदारांची मागणी सरकारनें पुरी केली आहे तुतीच्या झाडांचें लांकूड पुरेसें मिळत नाहीं, म्हणून तीं झाडें लावण्याचा कार्यक्रम पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आला आहे. गंगा हैड्रो इलेक्ट्रिक ग्रिडवर विजेच्या वापराचा धोकादायक भार पडत असतांना सुद्धा ह्या कारखानदारांना विजेचा पुरवठा करण्यांत आला. सर्वांत अधिक टंचाई रहाण्याच्या जागेची होती. कारखान्यांसाठी सुद्धा जागा पुरवावी लागली. मीरत येथें निर्वासितांसाठी ज्या इमारती बांधल्या होत्या त्यांत रहाण्याची व कारखान्यांची सोय करण्यांत आली.

### लखनौ येथील शैक्षणिक प्रदर्शन

लखनौ येथें उत्तर प्रदेश सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे लहान मुलांसाठी एक प्रदर्शन गेल्या महिन्यांत भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत सुमारें ५ हजार देशी-परदेशी खेळणीं मांडण्यांत आलीं होतीं. त्याशिवाय करमणुकीचे अनेक प्रकार होते. भारतीय इतिहासांतील कांहीं प्रसंग दाखविण्यांत आले होते. संगीत आणि नृत्य ह्यांचीहि तरतूद करण्यांत आली होती. प्रदर्शन एका सरकारी शाळेंत भरविण्यांत आलें होतें. तें संपल्यानंतर तेथेंच एक कायमचें वस्तु-संग्रहालय स्थापन करण्यांत येणार आहे. शाळांतील मुलांनीं तयार केलेल्या अनेक वस्तू प्रदर्शनांत मांडण्यांत आल्या होत्या. त्यांत शास्त्रीय खेळणीं, रेडिओ सेटस व एक यंत्रचालित थिएटरहि होतें. ब्रिटन, अमेरिका, झेकोस्लोव्हाकिआ, इटली, डेनमार्क, स्वीडन, नॉर्वे, न्यूझीलंड, द. आफ्रिका, इत्यादि देशांनीं प्रदर्शनांत भाग घेतला होता. सिक्किम, अंदमान, काश्मीर, प. बंगाल, मद्रास व राजस्थान भागांतून विविध प्रकारचीं खेळणीं आलीं होतीं. भारतीय संस्कृतीची परंपरा व सद्यःपरिस्थिती दाखविणारीं बरीचशीं चित्रें दोन प्रशस्त दालनांतून मांडण्यांत आलीं होतीं, तीं शिक्षकवर्गानें तयार केलेलीं होतीं. शास्त्रीय विभागांत शास्त्रविषयक मूलतत्त्वें समजावून देणारीं कांहीं छोटीं यंत्रें ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांत मानवी शरीराची एक प्रतिकृति होती. निरनिराळ्या देशांची भौगोलिक माहिती देणारा एक वेगळा विभाग होता. नेत्रद्वारा आणि कर्णद्वारा शिक्षण देण्याचीं उपकरणें दुसऱ्या एका ठिकाणीं ठेवण्यांत आलीं होतीं. बाल-वाङ्मयासंबंधीं निरनिराळ्या देशांत काय प्रयत्न चालले आहेत त्याची माहिती स्वतंत्र विभागांत एकत्रित करण्यांत आली होती. लखनौ विद्यापीठानें नुकतेंच एक फिरतें ग्रहमंडळ मिळविलें आहे. तें प्रथमच ह्या प्रदर्शनांत उपयोगांत आणलें गेलें. ह्या ग्रहमंडळामध्यें बसून ग्रहांच्या आकाशांतील हालचालींची गति बारकाईनें अवलोकन करतां येते.

---

## आळसंद येथें होणारा पक्का बंधारा

### श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांच्या हस्तें पायाभरणी समारंभ

आळसंद हें पूर्वीच्या औंध संस्थानांतलें एक प्रगतिप्रिय गांव पण तेथील शेती मागासलेली होती. दोन वर्षांपूर्वी मुंबई सरकारची अत्युपयुक्त पाटबंधारे योजना जाहीर झाल्यानंतर, त्या योजनेनुसार आळसंद येथील बंधारा सत्वर बांधला जावा म्हणून श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं गांवकऱ्यांतर्फे सरकारकडे विशेष प्रयत्न केले. ह्या बंधाऱ्याची उपयुक्तता व गांवकऱ्यांचें सहकार्य लक्षांत घेऊन त्याच्या बांधणीस सरकारनें मंजुरी दिली.

१७५ फूट लांबीचा व ७ फूट उंचीचा हा बंधारा दगड व सिमेंट-वाळूच्या पक्क्या बांधकामाचा होणार असून त्याला अंदाजी ५,५०० रु. खर्च येईल. बंधाऱ्यापासून जमिनी भिजेपर्यंत काढावयाच्या पाटाला व त्या पाटावरील छोट्या बांधकामाला अंदाजें रु. ८,७०० खर्च येणार आहे. ह्या पाटानें ३०० एकर जमीन भिजेल व त्यांपैकीं २०० एकरांस खरीप हंगामांत पाणीपुरवठा होईल असा अंदाज आहे, म्हणजे सदर योजनेस एकरीं रु. ७५ इतका खर्च येणार आहे.

ह्या बंधाऱ्याचा पायाभरणी समारंभ सोमवार ता. १४ रोजीं आळसंद गांवाचे हितचिंतक व पुरस्कर्ते श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांच्या हस्तें झाला.

## आटपाडी येथें बाँबे प्रॉ. को. बँकेची शाखा

### उद्‌घाटन समारंभ

तारीख १ जानेवारी, १९५२ रोजीं दी बँक ऑफ औंध लि., शाखा आटपाडीकडील कर्ज व ठेवींचा व्यवहार मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. ऑ. बँकेकडे वर्ग करण्यांत आला. सदर दिवशीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. ऑ. बँकेची आटपाडी येथें नवीन शाखा उघडण्यांत आली व त्या दिवसापासून दी बँक ऑफ औंध लि. शाखा आटपाडी बंद करणेंत आली. ता. १ जानेवारी, १९५२ रोजीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. ऑ. बँकेच्या आटपाडी शाखेचा उद्‌घाटन समारंभ श्री. विश्वनाथ गोविंद दर्शने, व्यापारी आटपाडी, यांचे अध्यक्षतेखालीं करणेंत आला. सदर समारंभास मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेचे मॅनेजर श्री. वाय. बी. गायतोंडे व बँक ऑफ औंध लि. चे डायरेक्टर श्री. आर. डी. मोजगांवकर व मॅनेजर श्री. बी. डब्ल्यू. घमंडे, त्याचप्रमाणें सोसायट्यांचे प्रतिनिधी, व्यापारी व शेतकरी मंडळी असे मिळून १५० चे वर लोक हजर होते.

### औंध बँकेच्या शाखेचें रूपांतर

प्रथमतः श्री. बी. डब्ल्यू. घमंडे, मॅनेजर दी बँक ऑफ औंध लि. यांनीं प्रास्ताविक भाषण करून प्रस्तुत समारंभाचें वैशिष्ट्य काय आहे व बँक ऑफ औंध लि. या संस्थेला सोसायट्यांचा सर्व व्यवहार कायद्याच्या बंधनामुळें मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेकडे द्यावा लागत आहे व त्या बँकेनें हा सर्व व्यवहार घेण्याचें मान्य केल्यामुळेंच, त्यांच्या शाखेचा उद्‌घाटन करण्याचा सुमंगल दिन आलेला आहे ही गोष्ट अत्यंत आनंदाची आहे, असें सांगितलें.

श्री. आर. डी. माजगांवकर, डायरेक्टर, दी बँक ऑफ औंध लि. यांनींहि भाषण करून मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैद्य व मॅनेजर श्री. गायतोंडे यांनीं या कामांत आपुलकीनें मदत केली म्हणून त्यांनीं त्यांचें औंध बँकेतर्फे आभार मानले. त्यानंतर श्री. गायतोंडे, मॅनेजर दी मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. ऑ. बँक लि. यांनीं मुंबई प्रॉव्हिन्शिअल को. बँकेची आटपाडी येथें शाखा कां काढावी लागत आहे हें सांगितलें व तसेंच या बँकेचा सहकारी संस्थांमार्फत जनतेची आर्थिक सोय करणें हाच उद्देश आहे व त्या दृष्टीनें आटपाडी भागांत सोसायट्यांमार्फत सर्व जनतेनें आपली उन्नती करून घ्यावी अशी थोडक्यांत उपयुक्त माहिती त्यांनीं विवेदन केली. त्यानंतर श्री. स. भि. शेटे यांनीं भाषण केलें. त्यानंतर अध्यक्षांनीं भाषण केलें.

आभार प्रदर्शन, पानसुपारी व चहापान होऊन समारंभ समाप्त झाला.

### वानरांची निर्गत

१९५१ च्या पहिल्या नऊ महिन्यांत भारतानें वानरें, पक्षी, साप, मेंढ्या वगैरेंची ८,५०,००० रु. ची निर्गत केली.

स्थापना ] पांढऱ्या कोडावर [ १९३६
श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. ता. वाडे जि. ठाणें लिहितातः— मी कोडाकरितां पुष्कळ औषधें केलीं पण गुण आला नाहीं. सरोखरच आपलेंच प्रभावी औषधानें माझे मुलीचें संपूर्ण कोड नाहींसें झालें. अशीं शेकडों प्रशस्तीपत्रें व बक्षिसें मिळालीं. किं. रु. ५ पो. ख. १५ आणे. वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरूळपीर, जि. आकोला (वऱ्हाड)

### सुवेझ कालवा

(१) भूमध्यसमुद्र आणि हिंदी महासागर ह्यांस जोडणाऱ्या ह्या कालव्यानें यूरोप ते भारत ह्यांतील अंतर ४,००० मैलांनीं कमी केलें आहे.

(२) कालव्याची लांबी १०१ मैल असून त्याची किमान खोली ३९ फूट आहे. त्याची रुंदी १९५ ते २४३ फूट आहे. वळणाचे ठिकाणीं रुंदी २६० ते ३७५ फूट ठेवली आहे.

(३) कालवा पार पाडण्यास आगबोटीला सरासरीनें ११ तास लागतात. भरलेल्या आगबोटीस प्रत्येक टनास २$\frac{3}{4}$ पेन्स इतकी पट्टी द्यावी लागते. ३०० टनांखालील व उतारू नसलेल्या आगबोटींना पट्टी माफ आहे.

(४) फर्डिनेंड दि लेसेप्स ह्याच्या पुढाकारानेंच हा कालवा खोदण्यास चालना मिळून कामें पुरें झालें. कालव्यासाठी १८५८ मध्यें कंपनी स्थापन करण्यांत आली. त्यांत फ्रेंच भांडवलदारांनीं तीन पंचमांश व खेदिवनें दोन पंचमांश भांडवल घातलें. कंपनीच्या परवान्याची मुदत १७ नोव्हेंबर, १९६८ रोजीं संपत आहे, त्या दिवशीं कालवा इजिप्त सरकारच्या मालकीचा होईल.

(५) कंपनीच्या व्यवस्था पाहणाऱ्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स-मध्यें १६ फ्रेंच, १० ब्रिटिश, ४ इजिप्शन, १ अमेरिकन व १ डच, असे डायरेक्टर्स आहेत.

(६) १८७५ सालीं ब्रिटिश सरकारनें खेदिवकडून १,७६,६०२ शेअर्स विकत घेऊन तें सर्वांत मोठें भागीदार बनलें. नफ्यापैकी ७१% नफा भागीदारांना, १५% इजिप्तच्या सरकारला, १०% उत्पादकांना, २% डायरेक्टरांना व २% कामगारांना पेन्शनसाठी वगैरे, अशी वांटणी होते.

(७) कालव्याची सुधारणा करण्याचें काम सतत चालू असतें. साडे सात मैल लांबीचा आणखी एक छोटा कालवा नुकताच पोर्ट सैद आणि बिटर लेक्स ह्यांच्या दरम्यांत खोदण्यांत आला आहे. त्यामुळें, आगबोटींची ये-जा होण्याची आणखी सोय झाली आहे. कालव्याची खोली २० इंचांनीं वाढविण्याचें काम चालू आहे.

(८) कालव्यांतून जाणाऱ्या आगबोटींपैकी ब्रिटिश ३२·५%, नॉर्वेजिअन १४%, अमेरिकन १०%, पनामानियन १०%, फ्रेंच ७·५% व इटालिअन ६·५% असतात. म्हणजे, कालव्याचा सर्वांत अधिक उपयोग ब्रिटिश व्यापारास होतो.

### जयपूर बँक लि.

वरील बँकेस गेल्या वर्षी ८,५९,१२० रु. नफा झाला, नफ्याची तरतूद करून परंतु मागील शिल्लक नफा त्यांत मिळवून नफावाटणीस १३,७१,३६९ रु. येतात.

कंपनी वृत्तः—
दी आदर्श कृषि संस्था लि. धुळें
या कंपनीस गेल्या चार वर्षांत खालील प्रमाणांत नेट-प्रॉफिट (ठोक नफा) झालाः—

| वर्ष | ठोक नफ्याचें प्रमाण |
|---|---|
| सन १९४७-४८ | ६·१ % |
| सन १९४८-४९ | ६·५ % |
| सन १९४९-५० | १३·६ % |
| सन १९५०-५१ | १८ % |

सन १९५१-५२ या सालांत ठोक नफ्याचें प्रमाण २०% पेक्षां अधिक होईल असा अंदाज आहे. शेअर भांडवल प्रतिवर्षी वाढत आहे व शेअर्सची विक्री चालू आहे.

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें १.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.



फोनः ३४५११ तारः SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—**

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—**

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

★

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B. मॅनेजर



( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,०८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.